## *प्रसिध्दी पत्रक*

१. मुंबई उपनगरातील अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई लि. (वितरण व्यवसाय) (अदानी-वितरण) च्या ग्राहकांना पाठविण्यात आलेल्या वाढीव वीज देयके आणि त्या संबंधीच्या तक्रारींच्याबाबत प्रसार माध्यमांमध्ये आलेल्या बातम्यांचा गांभीर्याने विचार करुन, आयोगाने अदानी-वितरणकडून ४ डिसेंबर, २०१८ रोजी स्पष्टीकरण मागितले होते.

२. त्यानुसार, अदानी-वितरणने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले आहेः

अ) ऑक्टोबर, २०१८ मधील उच्च तापमान आणि उच्च आर्द्रता पातळीमुळे नोव्हेंबर, २०१८ च्या वीज देयकांमध्ये वाढ झाली होती. मागील महिन्याच्या तुलनेत सरासरी एकूण सुमारे १५ टक्के अधिक वीज युनिट्स वापरण्यात आले होते. अशा वाढीव वापरामुळे निवासी ग्राहक जास्त वीज दर असलेल्या उच्च वीज वापर पातळीच्या वीज दर टप्प्यात आले. त्याशिवाय, मागील देय असलेल्या इंधन समायोजन आकारांचा (एफएसी) काही हिस्सा देखील या वीज देयकांमधून वसूल करण्यात आला. या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम वीज देयकांमध्ये वाढ होण्यात झाला. अदानी-वितरणच्या २७ लाख ग्राहकांपैकी सुमारे १.१० लाख निवासी ग्राहकांना सरासरी सुमारे २० टक्के वाढ असलेली वीज देयके प्राप्त झाली आहेत.

ब) ग्राहकांच्या देण्यात आलेल्या सरासरी वापराच्या वीज देयकांच्या संबंधात असे नमूद करण्यात आले आहे की, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कडून अदानीकडे वितरण परवान्याच्या मालकीचे स्थानांतरण होताना सुरुवातीच्या काळात वीज देयक कर्मचाऱ्यांनी नवीन मालकाकडे त्यांच्या जुन्या मागण्या मांडताना २७ ऑगस्ट, २०१८ ते १ सप्टेंबर, २०१८ दरम्यान संप केला होता. त्यामुळे वीज ग्राहकांचे मीटर वाचन उपलब्ध नसल्यामुळे, सुमारे ३.५३ लाख निवासी

ग्राहकांची वीज देयके सरासरी (निर्धारित) वापरच्या तत्त्वावर निर्गमित करण्यात आली. तथापि, असा निर्धारित वापर ऑक्टोबर, २०१८ च्या प्रत्यक्ष मीटर वाचनाच्या आधारे समायोजित करण्यात आला. त्यानंतर वीज देयके प्रत्यक्ष मीटर वाचनावर तयार करण्यात आली.

३. आयोगाला सकृतदर्शनी असे वाटते की, ऑक्टोबर, २०१८ च्या वीज वापर देयकांमध्ये या वर्षी जास्त वाढ झाली आहे. अदानी-वितरणच्या स्पष्टीकरणाची आणखी सविस्तर चौकशी होण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, मुंबईतील अन्य वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांच्या, विशेषतः कमी वीज वापर असलेल्या निवासी ग्राहक वर्गवारीच्या, वीज वापरावर हवामानाच्या स्थितीचा कोणता परिणाम झाला आणि मुंबईतील विविध वितरण परवानाधारकांनी इंधन समायोजन आकार (एफएसी) मागील देय वसुली इत्यादीच्या संबंधात आणि सरासरी वीज वापराच्या तत्त्वावर देयके निर्गमित करणेबाबत कोणती धोरणे स्वीकारली आहेत याची माहिती घेणे आवश्यक आहे.

४. आयोगाला सर्व ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्याची गरज वाटते, विशेषतः ज्या ग्राहकांवर वीज देयकांच्या अकस्मात वाढीमुळे विपरित परिणाम झाला आहे. या संदर्भात, आयोगाला, मुंबई आणि मुंबई उपनगरातील ग्राहकांच्या वीज वापरात झालेल्या आकस्मिक वाढीची कारणे तसेच अन्य कारणे शोधून काढण्यासाठी आणि अशा रीतीने विद्युत देयकांमध्ये आकस्मिक वाढ होण्याच्या घटना पुन्हा होऊ नये यासाठी सुधारणात्मक उपाययोजना आवश्यक असल्यास शिफारस करण्यासाठी एक सत्यशोधन समिती नेमणे आवश्यक वाटते. सदर समिती दोन सदस्यांची राहील.

५. तथापि, मधल्या काळात, अदानी-वितरणने केलेल्या उपाययोजनांशिवाय, आयोगाने अदानी-वितरणला ताबडतोब खालील उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत,

जेणेकरुन १० डिसेंबर, २०१८ रोजी सुरु होणाऱ्या पुढील देयकामध्ये अपेक्षित परिणाम समोर येतीलः

अ) अदानी-वितरण ज्या ग्राहकांना सरासरी वीज वापरापेक्षा अधिक देयक आकारण्यात आले आहे त्या ग्राहकांच्या वीज मीटर वाचनाची पडताळणी करील.

ब) जर जास्तीची वीज देयक आकारणी आढळून आल्यास, अशी रक्कम ग्राहकांना, विनियमांनुसार अनुज्ञेय व्याजासह, परत करण्यात यावेत

क) अदानी-वितरण जास्तीच्या देयक आकारणीच्या संबंधात ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यासाठी विशेष शिबीर आयोजित करील.

६. अदानी-वितरणसह सर्व वितरण परवानाधारकांनी आयोगाने मान्यता दिलेला वीज दर आणि इतर आकार यापेक्षा अधिक वीज देयकांची रक्कम आकारु नये याची खात्री करण्यासाठी या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.

-----------------